# अन्नधान्य स्वावलंबनासाठी काय करता येईल?



नेहमीप्रमाणे देवदर्शन आटोपून गणपत पारावर संपतच्या येण्याची वाट पाहात बसला होता. संपतही देवदर्शन आटोपून गणपतजवळ बसत म्हणाला, ''कारं गंपा, आज फार खूष दिसतोस?''

यावर गणपत म्हणाला, ''हो रं संपा. यावर्षी बऱ्यापैकी पैसा मिळाला शेतातून. मका, सोयाबीन आणि कापूस या तीनही पिकांनी चांगलाच आधार दिला बघ! कधी नव्हे एवढे पैसे यावर्षी मला या तीन पिकांतून झाले. आता वाटायला लागले की चांगले उत्पादन काढले तर शेतीमधून चांगला फायदा होतो. उगाच मी रडत बसतो शेती परवडत नाही म्हणून. या वर्षीसारखे उत्पादन दरवर्षी मिळाले आणि हाच भाव मिळाला तर नक्कीच शेती फायद्याची होईल आणि शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील, असा माझा विश्वास आहे.''

खरं तर सकाळी सकाळी गणपतचा विश्वास आणि आनंद संपतला हिरावून घ्यायचा नव्हता. परंतु त्याला कोणत्याही भ्रमात ठेवणे एक मित्र म्हणून संपतला पटले नाही. म्हणून शांतपणाने संपतने विषयाला हात घातला.

''खरंय तुझं म्हणणं गंपा. यावर्षी या तीनही पिकांपासून चांगला फायदा झाला तुला. परंतु खरं सांग, महाराष्ट्रातील किती शेतकऱ्यांना एवढे पैसे मिळाले असतील? सोयाबीनचे भाव वाढले कारण जागतिक पातळीवर तेलाचा तुटवडा आहे. दुसरे म्हणजे महाराष्ट्र- मध्य प्रदेश ही देशातील दोन आघाडीचे राज्ये सोयाबीन उत्पादक आहेत. या दोन्ही राज्यांमध्ये पावसामुळे सोयाबीनचे अतोनात नुकसान झाले. पावसात सोयाबीन भिजले, सडले, काळे पडले. सोयाबीनच्या उत्पादनात घट आली. मात्र जिथे योग्य प्रमाणात पाऊस झाला तेथील सोयाबीनची प्रत चांगली राहिली आणि उत्पादनही चांगले मिळाले. अशाच शेतकऱ्यांना खरं तर सोयाबीनच्या पिकामुळे जास्त फायदा झाला. जशी आपल्याकडे वातावरण चांगले असल्यामुळे आपल्या सोयाबीनच्या उत्पादनात वाढ झाली तशीच क्वालिटीही चांगली राहिली. हीच गत मका, कापसाची आहे. मक्याची मागणी वाढत आहे. परंतु त्या प्रमाणात उत्पादन मिळत नाही. कापसाचा विचार केला तर संपूर्ण जगामध्ये कापसाचे उत्पादन घटले आहे. मागील वर्षीसुद्धा जागतिक पातळीवर कापसाचे उत्पादन घटले होते. म्हणून कापसाला दोन वर्षे चांगला भाव मिळत आहे. अर्थात हीच परिस्थिती दरवर्षी प्रत्येक पिकाची राहील असे नाही. आपल्या जिल्ह्यात किंवा राज्यात कोणत्या पिकाची किती

लागवड झाली आणि किती उत्पादन येईल यावर बाजारभाव नाही ठरत! जागतिक पातळीवर त्या पिकाची काय स्थिती आहे त्यानुसार त्या पिकाचे दर ठरतात. यामध्ये हवामानाचा फार महत्त्वाचा वाटा आहे. कारण हवामानामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यापुढील काळात ढगफुटी, अतिवृष्टी, वादळे, दुष्काळ, अति तापमान वाढ आणि थंडी, गारपीट, धुके यांसारख्या समस्यांना शेतकरी आणि त्याच्या पिकांना सामोरे जावे लागणार आहे. यातून जो शेतकरी आणि त्याची पिके वाचतील त्यांचे चांगले पैसे होतील. म्हणजेच यापुढील काळ हा जास्त प्रमाणात अशाश्वत- बेभरवशाचा होणार आहे. एका भागातील शेतकरी उपाशी राहील तर दुसऱ्या भागातील शेतकरी तुपाशी! अर्थात कधी कोणाचा नंबर लागेल हे सांगता येणार नाही.''

खरं तर आज गणपत एवढ्या आनंदाने आणि उत्साहाने देवदर्शन घेऊन पारावर बसला होता- परंतु या आनंदावर विरजण टाकण्याचे काम संपतने केले, असे गणपतला वाटले.

''यार संपा, तू तर माझी हवाच काढून टाकली. तुझ्या म्हणण्याप्रमाणे शेती अशाश्वत- बेभरवशाची होईल. हे तर दररोज मरणाला घाबरून जगण्यासारखंच होईल की काय? मग आपण कोणाच्या भरवशावर शेती करायची? कोणाच्या भरवशावर शेतीमध्ये खर्च करायचा?''

यावर हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, मला काही तुझ्या आनंदावर विरजण घालायचं नव्हतं. माझं एकच म्हणणं आहे की, एखाद्या वर्षी एखाद्या पिकातून फार पैसे झाले तर हुरळून जाण्याची गरज नाही. खरं तर आपण आपल्या शेतीमध्ये पिकाचे सातत्य ठेवले पाहिजे. उगीच यावर्षी कोणाला लॉटरी लागली म्हणून आपणही त्यात उडी घेऊ नये. आपल्या शेतामध्ये एकाच प्रकारचे पीक करण्यापेक्षा दोन- तीन प्रकारची पिके करावी, जेणेकरून हवामान किंवा बाजारभावाचा फटका बसला तर जास्त आर्थिक नुकसान होणार नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या पिकाचा हवामानावर आधारित नुकसानीचा विमा काढून घ्यावा; कारण यापुढे विम्याचा उपयोग जास्त होईल. जागतिक पातळीवर देखील हवामानातल्या बदलांमुळे शेतीचे मोठे नुकसान होते. परंतु तेथे शेतकऱ्यांच्या पिकाचा विमा काढून झालेल्या नुकसानीनुसार त्याची रक्कम दिली जातो. खरं तर शेती व्यवसाय शाश्वत करायचा असेल तर शेतीमध्ये पिकांची विविधता, शेतीला जोड व्यवसाय, हवामानाच्या अंदाजानुसार पीक व्यवस्थापन आणि पीकविमा या बाबींचा अवलंब करावाच लागेल.''

गणपतने संपतच्या बोलण्यावर मान डोलावली व तो म्हणाला, ''मला एक सांग संपा, तू म्हणतो त्याप्रमाणे हवामानातल्या बदलांमुळे शेतीचे नुकसान वाढेल, उत्पादन घटेल ही झाली एक बाजू. दुसरी बाजू म्हणजे आज पिकाखालची जमीन कमी होत आहे. त्यामुळेही उत्पादन घटेल. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे दिवसेंदिवस तर लोकसंख्या वाढतच चालली आहे. या सर्व परिस्थितीमध्ये माणसांना खायला अन्नधान्य मिळेल की नाही? आज तर आपला शेतकरीही शेतीला वैतागला आहे. शेतकऱ्याची पोरं गाव सोडून शहराकडे जात आहेत. जे काही गावात शेती करतात त्यांच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होतो. मला तर हे सर्व म्हणजे एक चक्रव्यूहच वाटतो, जो शेतकऱ्यांभोवती तयार झाला आहे! अभिमन्यू जसा चक्रव्यूहामध्ये अडकून संपला तसं तर शेती आणि शेतकऱ्यांचं होणार नाही ना संपा?''

यावर हसत संपत म्हणाला, ''नको काळजी करू गंपा. तसं काहीही होणार नाही. आज आपला शेतकरी चक्रव्यूहामध्ये अडकला आहे. परंतु तो नक्कीच हा चक्रव्यूह भेदून बाहेर येईल कारण शेतकऱ्याची सहनशीलता फार मोठी आहे. एका वेगळ्या विचाराने आणि संस्काराने शेतकरी शेती करतो. पुढील १०-१५ वर्षे शेतकऱ्यांचा अंत पाहणारी आणि कठीण परीक्षा घेणारी आहेत. परंतु त्यानंतरच्या काळात परत शेतीमधून हिरे- मोती मिळतील. परत सोन्याचा धूर निघेल. खरंच मी हे बोलतो कारण देशाला- जगाला दोन वेळचे खायला घालण्याची क्षमता आपल्या देशातील शेतकऱ्यांची होती, आहे आणि भविष्यातही राहणार आहे. विविध प्रकारच्या जमिनी, विविध प्रकारचे हवामान आणि विविधांगी संस्कृतीमुळे आपली शेती भक्कम झालेली आहे. अर्थात यासाठी आपल्याला आत्मविश्वास वाढवावा लागेल. एक वर्ष एखाद्या पिकातून फार पैसे झाले तर त्या पैशांचा योग्य वापर केला पाहिजे. अनेकदा लॉटरी लागली की

चुकीच्या ठिकाणी गुंतवणूक होते आणि नंतर परत पैशाची अडचण निर्माण होते. तीन वर्षांतून एक वर्ष लॉटरी, एक वर्ष सर्वसाधारण आणि एक वर्ष नुकसान या हिशेबाने शेती व्यवसायाचे नियोजन केले पाहिजे. शेतीचा जोड व्यवसाय म्हटला तर पहिली तीन वर्षे फायद्याचा विचारच नको. पाच वर्षे त्या व्यवसायाला स्थिरस्थावर होण्यासाठी दिली पाहिजेत. खरं तर याप्रमाणे नियोजन करूनच शेती व्यवसायामध्ये कासवाच्या गतीने पुढे गेले तर पुढील काळ शेतीला नक्कीच उत्तम आहे. काही काळ कासवाच्या गतीने जाण्याची वेळ आली तरी चालेल परंतु ती शर्यत आपल्याला जिंकायची आहे. कारण भविष्यात 'अन्नधान्य स्वावलंबन' हा सर्व जगाला जो प्रश्न पडला आहे, त्याचे उत्तर फक्त आपल्याकडेच आहे.''

गणपतला संपतचे म्हणणे पटत होते. ''तू म्हणतो ते बरोबर आहे संपा. पण सरकारने शेतकऱ्यांचा काहीतरी विचार करून या संकटातून बाहेर काढण्यासाठी त्यांना मदत केली पाहिजे ना? नाही मदत केली आणि पुढील १०-१५ वर्षांत शेतकरी संपला तर पुढे मग अन्नधान्य स्वावलंबन कसे होणार आहे?''

यावर संपत हसून म्हणाला, ''हे बघ गंपा, सरकारी मदत ठीक आहे. परंतु फक्त सरकारी मदत, अनुदान यातच आपण अडकण्यापेक्षा सरकारकडे वेगळं काहीतरी मागितलं पाहिजे. दरवर्षी दुष्काळ पडला- करा पंचनामे! जास्त पाऊस- कमी पाऊस, गारपीट, वादळे या सर्वांचे पंचनामे करायला जेवढा खर्च येते तेवढा खर्च तरी भरून मिळतो का शेतकऱ्यांना? खरं तर हे पंचनामे करून पैसे देणाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून- हवामानामध्ये ज्या घटकांमुळे जेवढे उत्पादन कमी झाले तेवढी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली तर इतर भानगडीच राहणार नाहीत. परंतु शासनाचे काम कसे असते, ढोल वाजवून रुपया टेकवायचा आणि वरून आम्ही मदत केली किंवा आमच्यामुळे सरकारने मदत केली! हे राजकारण मतांसाठी चालणारच. आपण मात्र आपल्याला नेमकं काय पाहिजे हे स्पष्टपणे सांगितलं पाहिजे. हवामानातल्या बदलांनुसार पीकविमा, बाजारभावाचा विमा, शेतीमालाला योग्य हमीभाव आणि त्यानुसार खरेदी या सर्व बाबी आज ना उद्या शासनाला कराव्याच लागतील किंवा त्या केल्या नाही तर त्यासाठी आपल्याला शासनावर दबाव आणावा लागेल. शासनाची भीक घेण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या हक्काचे मिळण्यासाठी प्रयत्न केला तर नक्कीच शेती आणि आपला हा जगाचा पोशिंदा शेतकरी फायद्यात राहील.''

संपतच्या या बोलण्यामुळे गणपतला उभारी आली. तो म्हणाला, ''तू म्हणतो ते बरोबर आहे संपा. आपण आपलं शेतातलं चांगलं काम सुरू ठेवलं पाहिजे आणि अन्यायाबद्दल सरकारला जाब विचारलाही पाहिजे. चल, सरकारला नंतर जाब विचारू. आता चहा घेऊ आणि लागू आपल्या शेताच्या कामाला.''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)** ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**